**महाराष्ट्र शासन**

क्र.-झेरॉक्स-२०२२/प्र.क्र.३३/गृ.व्य.
महसूल व वन विभाग, १ ला मजला,
मंत्रालय मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०६ मार्च, २०२३

प्रति,

मे. कॉपी क्लासिक, A5 /1
शिवाजी नगर, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ पूर्व, मुंबई-४०० ०५५

**विषय: महसूल व वन विभाग (खुद्द) साठी तीन झेरॉक्स यंत्रे भाडेतत्त्वावर खाजगी यंत्रचालकाच्या सेवेसह आणि कागदासह (With Paper) घेण्यासाठी सेवा संविदा करार करण्याबाबत**

संदर्भ:- १. या विभागाची महाटेंडर वरील ई-निविदा सूचना दि. २१ डिसेंबर, २०२२, दिनांक ११ जानेवारी, २०२३ व दिनांक १८ जानेवारी, २०२३
२. आपली दि. १५.०१.२०२३ ची ई-निविदा व दि. ०२.०३.२०२३ रोजीचे संमती पत्र

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संदर्भाधिन क्र. २ येथील ई-निविदेच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपण या विभागास सादर केलेली नवीन डिजीटल झेरॉक्स मशीन भाडेतत्त्वावर पुरविण्याबाबतची निविदा व त्याअनुषंगाने संदर्भ २ येथील प्रती पृष्ठ रूपये ०.३८ (GST सह) झेरॉक्सचे दराबाबत दिलेले संमतीपत्र विभागाने स्वीकृत केले आहे. (करार कालावधी दि. ०१.०४.२०२३ ते दि. ३१.०३.२०२४ असा राहील.)

२. संदर्भ २ येथील सहमती पत्राप्रमाणे नवीन डिजीटल झेरॉक्स मशीन भाडेतत्त्वावर यंत्रचालकाच्या सेवेसह आणि कागदासह (With Paper) सेवा पुरविण्यासाठी नमूद केलेले झेरॉक्स प्रतिपृष्ठ रु. ०.३८/- (अडतीस पैसे फक्त (GST सह)) दर व त्यादरामध्ये (A४ to A३) (including Operator, Paper, Machine maintenance, Toner & Spares) हा दर विभागाने स्वीकृत केला आहे. त्यानुसार आपण विभागाच्या कार्यालयीन वापरासाठी तीन झेरॉक्स मशीन सदर पत्र प्राप्त होताच दि. ०१.०४.२०२३ पुर्वी विभागास उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. आपण झेरॉक्स मशीन विभागास उपलब्ध करुन दिल्याच्या दिनांकापासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी म्हणजे दि. ०१.०४.२०२३ ते दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत विभागाच्या ताब्यात राहतील.

तसेच विभागाने प्रसिध्द केलेल्या दि. १८ जानेवारी, २०२३ मधील अटी व शर्तीचे समाधानकारक अनुपालन न झाल्यास विभागासोबत करण्यात येणारा करार कधीही संपुष्टात आणुन आपल्या कंपनीस काळया यादीत टाकुन आपणास भविष्यात शासकीय काम करण्यास प्रतिबंधीत करण्यात येईल.

३. सदर पत्र मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत करारातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे करारपत्र रु. २००/- मुद्रांकावर लिहून देणे बंधनकारक राहील. तसेच निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे रूपये १ लाख अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. शासनास जमा करावा, ही विनंती.

आपला,

(माणिक वि. ढमाले)
कार्यासन अधिकारी, महराष्ट्र शासन

**प्रत: निवड नस्ती (गृह व्यवस्थापन,) महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई-३२**

F:\patil\Xerox E-Tender-२०२३.docx